# प्रकरण पाचवे

# उपसंहार

## – प्रकरण पाचवे –

## – उपसंहार –

---

आतापर्यंतगेल्या चार प्रकरणातून पु.ल. देशपांडे यांचे व्यक्तित्व तसेच 'व्यक्ति आणि वल्ली' व 'गणगोत' मधील व्यक्तिचित्रणाचे विशेष याची सर्वांगिण तात्विक चर्चा केली. या चर्चेचा एकत्रित आटोपशीर विचार या ठिकाणी करावयाचा असून एका अर्थाने संपूर्ण प्रबंधाचे हे विहंगमावलोकनच आहे. पु.ल. देशपांडे यांच्या व्यक्तिचित्रणाचे विशेष, 'व्यक्ति आणि वल्ली' व 'गणगोत'च्या आधारे केले आहे.

पु.ल. देशपांडे यांचे व्यक्तिमत्व अनेक पैलूने बहारले आहे. प्रतिभासंपन्न लेखक, दर्दी गायक, कुशल नट, जाणकार दिग्दर्शक, मार्मिक नकलाकार, चतुर विडंबनकार, निष्णात हार्मोनियम वादक, प्रभावी वक्ता असे देशपांडयांच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू आहेत. अध्यापन, नभोवाणी, दूरचित्रवाणी यासारख्या क्षेत्राशी त्यांचा थोडा बहुत संबंध आला होता. तिथे देखील त्यांच्या असाधारण व्यक्तिमत्वाचा ठसा उमटल्यावाचून राहिला नाही. पु.ल. देशपांडे यांचे बहुरंगी आणि बहुढंगी व्यक्तिमत्व होते. उपास्य दैवताची उपासना करणाऱ्या एखाद्या भाविकाप्रमाणे आपल्या कलात्म वृत्तीवर प्रेम केले. कलेची उभ्या जन्मात ज्यांची कधी तोंडओळख झाली नाही अशा मंडळींच्या ठिकाणी त्यांना माणुसकीचा आढळ झाला. कलेइतकीच माणुसकीचीही त्यांना कदर आहे. जीवनाचा अनुभव घेऊन ते नीट पचवून लेखणी हातात घेणारे, पु.ल. सारखे एखादेच साहित्यिक आहेत. पु.लं.च्या लेखनात बहुविध नमुन्यांचे जणू रसायनच होते. निष्ठावंत गुरूजनांच्या सहवासात पु.लं.ची अभिजात प्रतिभा पोसली जात होती. प्रयत्नवादी, ध्येयनिष्ठ, संस्कार संपन्न वडीलधाऱ्या पुरूषांचे बोट धरून पहिलीवहिली पावलं टाकली.

पु.लं.च्या आई वडिलांनी त्यांची नाटय नि संगीत विषयक अभिरूची जोपासली. तर

आजोळच्या आजीकडून विनोदबुद्धीचे देणे मिळाले. तसेच आजोबांनी काव्यात्मकतेचे संस्कार केले. पु.लं.च्या मातोश्रींनीही त्यांचा संगीताचा छंद जोपासला. पु.लं.ना गायनाबरोबरच अभिनयाचीही उपजत देणगी मिळाली होती. पुढे कॉलेजच्या वातावरणात त्यांच्या संगीत, अभिनय, नकला, वक्तृत्व यांच्या विकासाला खूप वाव मिळाला. पुढे पु.लं.नी टोपण नावाचा बुरखा घेऊन अभिरूची मासिकातून प्रथम ते वाचकांसमोर आले. नंतर मात्र टोपण नावाचा बुरखा टाकून उजळ माथ्याने वाचकांसमोर आले. लेखन गुणांमुळे रसिक, वाचक पु.लं.कडे अधिक प्रमाणात आकर्षित होऊ लागले. पु.लं.ची प्रतिभा साहित्य आणि नाटय या दोन्ही क्षेत्रात मग्न होती. रंगभूमीच्या क्षेत्रात त्यांनी नट म्हणून प्रवेश केला पण नंतर ते नाटककार म्हणून जगापुढे आले. 'अंमलदार' मधल्या सर्जेरावच्या भूमिकेने 'नट' म्हणून नि 'तुझे आहे तुजपाशी' या नाटकाने 'नाटककार' म्हणून त्यांनी मिळवून दिलेली कीर्ती कुणालाही हेवा वाटावा अशा स्वरूपाची होती. दिग्दर्शन, संगीत, पटकथा, संवादलेखन अशा अनेक आघाड्या एकाच वेळी सांभाळून चित्रपटसृष्टीत त्यांनी नवा विक्रम केला. त्यामुळे 'सब कुछ पु.ल.' हे नवे बिरूद त्यांना सिनेशौकिनांनी बहाल केले, ते त्यांच्या अनन्यसाधारण कर्तृत्वामुळे. 1946 साली पु.लं.चा विवाह सुनिताबाई ठाकुर ह्यांच्याशी झाला. आता कुठेतरी स्थिर व्हावे असा विचार पु.ल. करीत होते पण इतक्यात असा योगायोग यायचा नव्हता, कारण नाटक, चित्रपट याच्या निमित्ताने त्यांना पुन्हा भ्रमंती सुरू झाली. पु.लं.नी जीवनकलहाच्या चक्रातही एल.एल.बी. नि बी.ए. ची पदवी पदरात पाडून घेतली आणि त्याच जिद्दीने ते एम.ए. ची परीक्षाही सन्मानपूर्वक उत्तीर्ण झाले आणि प्राध्यापक म्हणून ते बेळगावच्या राणी पार्वतीबाई कॉलेजात प्राध्यापकाच्या जागेवर रूजू झाले. तेथेही अंतर्गत कारभाराशी जुळते न घेता आल्यामुळे त्यांना आपल्या नोकरीचा राजीनामा द्यावा लागला. नंतर ते मुंबईच्या कीर्ती कॉलेजात अध्यापन करू लागले. नंतर मालेगाव येथे स्थापन करण्यात आलेल्या 'महात्मा गांधी विद्यामंदीर' या संस्थेच्या प्राचार्यपदी त्यांची नियुक्ती झाली पण तेथेही काही मतभेद आल्यामुळे अधिकारपदाचा राजीनामा द्यावा लागला. त्यानंतर 1955 मध्ये ऑल इंडिया रेडिओत नाटयविभाग प्रमुख म्हणून दाखल झाले. 1958 मध्ये रेडिओ मार्फत विलायतेस गेले तेथील वास्तव्यात त्यांनी दूरचित्रवाणीच्या तंत्राचे सूक्ष्म निरिक्षण केले.

पु.लं.नी प्रवासात आलेले तऱ्हेतऱ्हेचे अनुभव 'अपूर्वाई' या प्रवासवर्णनात ढंगदार शैलीने कथन केले आहे. दिल्ली रेडिओच्या ध्वनिचित्र शाखेचे चालक म्हणून त्यांची नेमणूक झाली. आणि त्याचवेळी अखिल भारतीय नभोवाणी केंद्राचे डेप्युटी चीफ ड्रामा प्रोडयुसर हे अधिकारपदही बहाल करण्यात आले. परंतु ते पद अल्पजीवी ठरले. 1962 साली पुन्हा त्यांना परदेशगमनाची संधी मिळाली. आग्नेय आशियातील महत्वाचे प्रदेश, जपान व चीनचा काही भाग यांना भेट देऊन त्यांनी 'पूर्वरंग' या आपल्या दुसऱ्या प्रवासवर्णनपर ग्रंथात अपूर्वाईतल्या प्रमाणे रोचक शैलीने पु.लं.नी आपले अनुभव निवेदन केले. त्याच वर्षाच्या शेवटी त्यांनी अमेरिकेस प्रयाण केले ते साहित्यिक पत्रकार मंडळाचे सभासद म्हणून. त्यानंतर पु.लं.नी कुठल्याही नोकरीत स्वतःला गुंतवून घेतले नाही तर स्वतंत्रपणे जीवन जगण्याचा निर्धार त्यांनी केला. रसिकांना हसविण्याचा अभिनव उपक्रम त्यांनी सुरू केला. नुसते हसविण्याचा नाही तर हसविता हसविता त्यांना अंतर्मुख बनवून आत्मपरिक्षण करायला लावण्याचे महान श्रेय त्यांनी संपादित केले.

इंद्रधनुष्याच्या रंगाप्रमाणे त्यांच्या वाड्.मयातल्या हास्य आणि करूण यांच्या छटा एकमेकींत पूर्णपणे मिसळत. मानवी जीवनातील वैगुण्य, अपूर्णता, अपेक्षाभंग हेच त्यांच्या विनोदाचे आहे. विनोद विषय झालेल्यांना सुद्धा व्यंगाचे हसू येऊन पु.ल.च्या हास्यात आपले हास्य मिसळून टाकावेसे वाटावे अशा कौशल्याने ते विनोदाचे हत्यार वापरत असत. "He laughs not at the people but with the people" नैराश्याचा अंधःकार नाहीसा करणे, उदासीनतेची कोळिष्टके झटकून टाकून ढोंगाचा फुगा फोडणे, दुःखाश्रू पुसणे हे पु.लं.च्या विनोदाचे प्रयोजन आहे. पु.लं.च्या विनोदी वाड्.मयाचे वैशिष्टये निर्मळ निरागस मत आहे, तशी चिंतनशील प्रकृतीही आहे. 'हसविण्याचा माझा धंदा' असे स्वतःबद्दल पु.लं.नीच स्वतः म्हणून ठेवल्यामुळे 'पु.ल. म्हणजे विनोद' हे समीकरण वाचक प्रेक्षकांच्या मनात दृढमूल होण्यास आणखीनच मदत झाली आहे. पु.लं.चे कोणतेही वाड्.मय वाचीत असताना प्रथम काही जाणवत असेल तर त्यांची प्रखर वैचारिक भूमिका. या वैचारिकतेमागे त्यांचे अत्यंत संपन्न, अष्टपैलू आणि जागरूक अशा कलावंताचे व्यक्तिमत्व उभे असल्याने त्यांची ही वैचारिकता अतिशय आत्मनिष्ठ अशा स्वरूपात सदैव अविष्कृत होते या जागरूकतेपोटी समाजातील सर्व क्षेत्रातील असंख्य विसंगती, अगणित सोंगे, ढोंगे

विपरीत कल्पना आणि अपरिमित मुखवटे इत्यादी रोगट प्रवृत्तीचा ते सदैव समाचार घेताना दिसतात. पु.लं.ची दृष्टी जशी चौफेर तसाच तिचा हेतू अतिशय उदात्त आणि संस्कृतिनिष्ठ असतो. 'विनोद' हा त्यांचा अत्यंत प्रभावी असा हुकमी एक्का आहे. प्रखर वैचारिकता हुकमी विनोदाच्या साहाय्याने अगदी सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहचविण्यात पु.ल. देशपांडयांइतके यश आतापर्यंत कोणालाच प्राप्त झाले नव्हते.

पु.लं.चा पिंड जसा कलावंताचा आहे, तसाच समाजसुधारणेचाही. हे ध्यानात घेतल्याशिवाय त्यांच्या विनोदाचे खरे स्वरूप आकलन होऊ शकणार नाही. कोणत्याही विनोदी लेखकाच्या लेखनात श्लेष, कोटया, अतिशयोक्ती, वक्रोक्ती, विडंबन, उपहास, उपरोध ही विनोदाची अंगे कमी अधिक प्रमाणात आढळून येतात तशी ती पु.लं.च्याही लेखनात आढळून येतात. शब्दनिष्ठ, कल्पनानिष्ठ, स्वभावनिष्ठ इत्यादी विनोद प्रकारांचाही त्यांच्या वाङ्‌मयात आढळ होतो. पु.लं.च्या विनोदाच्या बाह्य स्वरूपाची चिकित्सा करता येईल, परंतू त्याचे अंतरंग स्पष्ट करून सांगणे, त्याचा अभिजातपणा, त्याची प्रसन्नता, त्याचा निर्मळपणा या गुणांचे विवरण करणे मात्र कठीण आहे. लेखनाप्रमाणे पु.लं.च्या व्याख्यानातूनही विनोदबुद्धीचा प्रकर्षाने आढळ होत असतो. साहित्य संमेलन, नाटयसंमेलन, सत्कारसमारंभ, तमाशा, परिषद वगैरेसारख्या प्रसंगी कधी अध्यक्ष म्हणून, तर कधी वक्ता म्हणून त्यांनी केलेली भाषणे खुसखुशीत मार्मिक रसाळ नी विचार परिलुप्त वक्तृत्वाचा उत्कृष्ठ नमूना म्हणून श्रोत्यांच्या लक्षात राहतील. पु.लं.नी विनोबांच्या भूदान यात्रेत सामील होऊन काही काळ आपला देहही कष्टविला आहे. आगरकरांना गुरूस्थानी मानणाऱ्या आपल्या आजोबांकडून पु.लं.नी बुद्धीप्रामाण्य आणि सुधारकी मत जरी उचलले असले, तरी निष्ठाशून्य नास्तीकता अगर धर्मलंढपणा त्यांना शिवला नाही. हिंदू धर्मात, हिंदू संस्कृतीत, जे जे विधायक आहे, जोपासण्यालायक आहे. त्याचा पुरस्कार करण्यात पु.लं.ना यत्कींचीतही कमीपणा वाटत नाही. भगवान श्रीकृष्ण, शिवबा, रामदास, लोकमान्य टिळक या साऱ्या विभूतींना नि महापुरूषांना जी राजनीती अभिप्रेत होती, तिच्यावरच पु.लं.चीही श्रद्धा आहे. पु.लं.चा राजकारणाकडे पाहण्याचा रोखठोक व्यवहारी दृष्टीकोन आहे. साहित्यावरली भक्ति जितकी उत्कट आहे, त्यांची संगीत विषयक

आसक्ती जितकी अस्सल आहे, तितकीच त्यांची राष्ट्रनिष्ठाही प्रखर आहे, ज्वलंत आहे.

पु.ल. देशपांडे खरोखरच बहुरंगी, बहुढंगी व्यक्तिमत्व आहे. 1962 साली पु.ल. साहित्यिक पत्रकार मंडळाचे सभासद म्हणून अमेरिकेला जाऊन आले. त्याठिकाणी गेल्यानंतर स्वत्वाचा विसर न पडू देणारी पु.लं.ची ही वृत्ती पाहिली म्हणजे सावरकरांच्या अस्मितेची आठवण होते. स्वदेश, स्वधर्म, स्वसंस्कृती याविषयी पु.लं.ना वाटणारी आत्मीयता परदेशात गेल्यावरही अखंड राहते. हरिभाऊ आपटे, अण्णासाहेब किर्लोस्कर, गडकरी, परांजपे साहित्याविषयी पु.ल. ज्या आदराने बोलतात. त्याच आस्थेने अन् आपुलकीने ते अलीकडच्या कवी, लेखकांच्या गुणांचीही कदर करतात. लेखणीचे सामर्थ्य ज्या साहित्यिकांना ओळखता आले त्यांच्याबद्दल, मग ते नवसाहित्याचे निर्माते असोत, वा जुन्या साहित्याचे. पु.लं. ना कमालीचा आदर वाटतो. संगीत आणि नाटय यांच्याकडे पाहण्याचा पु.लं.चा दृष्टीकोनही असाच समतोल, उदार नि तर्कसंगत आहे. तसेच गायकीच्या निरनिराळया परंपरांची उपासना करणाऱ्या गायकांच्या कष्टांचे, त्यांच्या निष्ठेचे, नि संगीतापायी सर्वसंग परित्याग करणाऱ्या 'अवलीया' वृत्ती ते ज्या आदराने कौतुक करतात तितक्याच निर्भीडपणाने त्यांच्यातल्या दोषाचाही निर्देश करतात. नाटक आणि संगीत यांच्या अन्योन्य संबंधाविषयी त्यांनी वक्तविलेला अभिप्रायही उद्बोधक आहे. संगीताने मराठी नाटक तारले, त्याला चिरसंजीवन मिळाले अशी पु.लं.ची धारणा आहे. नाटकात स्वगताचा कौशल्याने उपयोग केल्यास ते नाटयोत्कर्षास बाधक न ठरता साहाय्यकच ठरणार आहे असे पु.ल. म्हणतात. नाटयाकडे पाहण्याचा पु.लं.चा दृष्टीकोण चोखंदळ, बारकाईचा आहे. साहित्य, नाटय, संगीत चांगले कोणते, वाईट कोणते, विधायक कोणते, विध्वंसक कोणते याचा पु.लं.नीच प्रथम विचार केला. पु.लं.ना चांगल्या वाईटातले अंतर कळायला बाह्य साधनांची आवश्यकता वाटत नसावी. पु.लं.ना प्रतिकूल परिस्थितीला तोंड देण्याचे वारंवार प्रसंग येत गेले. पण उपजत विनोद बुद्धीमुळे त्या प्रसंगातला कडवटपणा त्यांना पचविता आला. पु.लं.सारखा निर्मळ इतका निरागस प्रसन्न विनोद यापूर्वी महाराष्ट्राला कुणी दिला नाही. पण याबद्दल त्यांना गर्व नाही. पु.लं.च्या ठिकाणी लीनता, नम्रता हे गुण प्रकर्षाने वास करीत आहेत. पु.ल. सारख्या मेणाहून मऊ वाटणाऱ्या माणसाने वज्राचाही विध्वंस करील असे काठिण्य

विधात्याने कुठे तरी लपविलेले असते. पु.लं.च्या प्रमाणे त्यांच्या पत्नी सुनिताबाई यांना कलेची आवड होती. पु.ल.देशपांडे यांचे व्यक्तिमत्व बहुरंगी आणि बहुढंगी पैलूने बहारले आहे.

**पु.ल. देशपांडे यांच्या व्यक्तिचित्रणांचे विशेष :-**

'व्यक्ति आणि वल्ली' आणि 'गणगोत' आधारे याचा विचार करताना प्रथम 'व्यक्तिचित्रण' एक वाङ्.मय प्रकार याचा विचार केलेला आहे. वाङ्.मयाच्या बहुसंख्य प्रकारांमध्ये व्यक्तिमत्वाचे दर्शन घडत असते. वाङ्.मयाच्या निरनिराळया प्रकारात घडणारे हे दर्शन म्हणजे व्यक्तिचित्रण असते. व्यक्तिचित्र आणि व्यक्तिचित्रण याच्यात फरक आहे. कुणी म्हणते व्यक्तिचित्र हा कथेचा प्रकार तर कुणाच्या मते तो चरित्रवाङ्.मयाचा एक उपप्रकार आहे, तर कुणी त्याला व्यक्तिपर निबंध असे समजतात. वाङ्.मय प्रकारांची पुष्पे निरनिराळी असली तरी त्यांना जोडणारा धागा एकच असतो. या कारणामुळे सर्वच वाङ्.मय प्रकारात आत्माविष्कार भाषेचे कार्य, नाटय, काव्यात्मता, संवाद, वातावरण निर्मिती, लेखकाचा दृष्टीकोण इत्यादी अनेक घटक कमी-अधिक संख्येने कमी अधिक प्रमाणात पाहावयास मिळतात. वाङ्.मय प्रकारातली समानसाहित्य-तत्व: . साहित्य हा शब्द 'सहित' या शब्दापासून तयार झाला. सहित कशाचे? तर शब्दाचे आणि अर्थाचे. आत्माविष्काराचा अनुभव देण्या–घेण्याच्या हेतूने साहित्याची निर्मिती केली जाते. ललित वाङ्.मयाचे सर्व प्रकार म्हणजे कमी–अधिक प्रमाणात माणसाने माणसांसाठी केलेला माणसांचा शोध होय. साहित्य आणि साहित्य प्रकार यातून हेच दृष्टोत्पत्तीस येते. मानवातील जे जे लक्षणीय ते ते वाङ्.मयात येत असते. त्याप्रमाणे व्यक्तिचित्राच्या मूळाशी मानवातील किंवा विशिष्ट अशा वर्ण्य व्यक्तीमधील लक्षणीय असे काही दाखवावे. प्रमुख असे साहित्य किंवा वाङ्.मय तत्व एकच आहे. फक्त निरनिराळया वाङ्.मय प्रकारांद्वारे दिसणारी त्याची रूपे मात्र भिन्न आहे.

वाङ्.मय प्रकाराच्या मनात निर्माण होणाऱ्या सृष्टीशी जी त्याची तादात्म्यावस्था असते ती यथातथ्यपणे व्यक्त करण्यासाठी याला मूळ सृष्टीशी अनुरूप अशा तऱ्हेचे माध्यम वापरावे लागले... हे माध्यम मुख्यतः प्रतिमांचे असले तरी त्या प्रतिमासुद्धा अनुरूप अशा तऱ्हेनेच व्यक्त कराव्या लागतात या प्रक्रियेतूनच निरनिराळे वाङ्.मय प्रकार निर्माण होतात. कथा, कादंबरी, नाटक, काव्य अशा प्रकारांप्रमाणेच व्यक्तिचित्र हा प्रकार देखील याच आवश्यकतेपोटी निर्माण झालेला दिसतो.

साहित्याचा हेतू व विषय व्यक्ती आणि व्यक्तित्त्व प्रकट करणारा असल्यामुळे व्यक्तिचित्र निर्माण झाले असावे.

मराठी वाड्.मयात कथा, कादंबरी, नाटय, चरित्र, निबंध हे प्रमुख वाड्.मय प्रकार मानले जातात. लघुनिबंध आणि आत्मचरित्र हे अनुक्रमे निबंध व चरित्राचे उपप्रकार असूनही स्वतंत्र वाड्.मय प्रकार म्हणून अस्तित्वात आहेत. मात्र ललित गद्य हा मराठी वाड्.मयातील असा एक प्रकार आहे की, ज्या लेखनात स्वतंत्र वाड्.मय प्रकार म्हणून समावेश होत नसेल त्या सर्व लेखनाचा समावेश ललित गद्यात होतो. परंतु ललित गद्य हा स्वतंत्र वाड्.मय प्रकार मात्र नाही. या ललित गद्यामध्ये प्रवासवर्णन विनोदी लेखन, व्यक्तीपर लेख, मृत्यूलेख, आठवणी, रिपोर्टाज किंवा वृत्तांत कथन, शब्दचित्र व त्याचे प्रकार इत्यादींचा समावेश होतो. व्यक्तिचित्र हा विषयदृष्टया शब्दचित्राचा एक प्रकार. ललित गद्यापैकी प्रवासवर्णन हा लेखन प्रकार स्वतंत्र वाड्.मयप्रकार म्हणून विकसित झाला. मात्र अजूनही त्याचा उल्लेख ललित गद्याखेरीज स्वतंत्रपणे केला जात नाही. व्यक्तिचित्र हा ललित गद्याचा एक प्रकार असला तरी तो स्वतंत्र वाड्.मय प्रकार म्हणण्यासारखा विकसित झाला आहे. त्याची व्याख्या, वाड्.मयीन अंगोपांगे यांची चर्चा केली असता किंवा इतर प्रचलित प्रमुख किंवा दुय्यम वाड्.मय प्रकारांशी त्याची तुलना केली असता असे दिसून येते की व्यक्तिचित्र हे इतर प्रमुख वाड्.मय प्रकार आणि ललित गद्यांतर्गत लेखन प्रकार यांच्याहून वेगळे आहे.

व्यक्तिचित्र आणि व्यक्तिचित्रण याबाबत अनेक गैरसमज प्रचारात आहेत. व्यक्तिचित्रण हा अनेक वाड्.मय प्रकारातील एक महत्वाचा घटक आहे. व्यक्तिचित्रणाचे त्या त्या वाड्.मय प्रकारात किंवा कलाकृतीत कितीही महत्व असले तरी व्यक्तिचित्रण कायम दुय्यम स्थानावर येते. त्यामुळे व्यक्तिचित्राखेरीज अन्य वाड्.मय प्रकारातील व्यक्तिचित्रण कितीही जिवंत प्रत्ययकारी व सत्यानुभूतीवर आधारीत असले तरी देखील ते स्वतंत्र नसते. त्यामुळे व्यक्तिचित्राखेरीज अन्य वाड्.मय प्रकारात येणारे व्यक्तिचे वर्णन किंवा दर्शन हे व्यक्तिचित्र नसून व्यक्तिचित्रण असते. व्यक्तिचित्र आणि व्यक्तिचित्रण यांच्यात काही गल्लत केली जाण्याची शक्यता असते. कारण त्यांच्यात काही साम्य भासते. जरी व्यक्तिचित्र आणि व्यक्तिचित्रणात साम्य असले तरी ते वरवर स्वरूपाचे आहे. व्यक्तिचित्र आणि व्यक्तिचित्रण यांच्यात साम्यापेक्षा भेदच अधिक आहेत. त्यामुळे व्यक्तिचित्र आणि व्यक्तिचित्रण

यांचे स्वरूप भिन्न आहे. व्यक्तिचित्रणातील व्यक्ती रेखाटताना व्यक्ती दर्शनाऐवजी व्यक्ती निरूपणात्मक रूप येते. व्यक्तिचित्र काढताना अलिप्त रेखाटनाने व्यक्तिचित्राची परिणामकारकता वाढते. व्यक्तिचित्र हे स्थिर स्वरूपाचे असते तर व्यक्तिचित्रणात गतिमानता असते. काही वेळा व्यक्तिचित्राला व्यक्तिचित्रण आणि व्यक्तिचित्रणाला व्यक्तिचित्र म्हटले जाते. परंतु व्यक्तिचित्र हा स्वतंत्र वाङ्.मय प्रकार आहे आणि व्यक्तिचित्रण हे वाङ्.मय प्रकारातील अंग आहे. दोन्ही प्रकार एकमेकांपासून संपूर्णपणे वेगळे आहे त्यामुळे प्रमुख व दुय्यम वाङ्.मय प्रकार आणि व्यक्तिचित्रा याहून व्यक्तिचित्राचे वेगळे स्वतंत्र अस्तित्व आहे. व्यक्तिचित्रण वाङ्.मय प्रकाराची चर्चा केल्यानंतर पु.ल. देशपांडे यांच्या व्यक्तिचित्रणाचे विशेष 'व्यक्ति आणि वल्ली' आणि 'गणगोत' च्या आधारे याचा भाग येतो.

'व्यक्ति आणि वल्ली' ची पहिली आवृत्ती 1962 साली प्रसिद्ध झाली. या व्यक्तिचित्रांत पु.लं.च्या विनोदबुद्धीचा आढळ तर होतातच त्याशिवाय वर्ण्य पाहण्याचा त्यांचा जिव्हाळयाचा दृष्टीकोन, मानवी स्वभावातील विविधता अन् वैचित्र्य याचे दर्शन घडविणारी त्यांची सूक्ष्म निरीक्षणशक्ती, वर्णन शैलीतली मार्मिकता वगैरे गुणांचाही सुखद प्रत्यय येतो. व्यक्ति आणि वल्लीत एकूण वीस लेख समाविष्ट करण्यात आले आहेत. ही व्यक्तिचित्र काल्पनिक असली तरी असंभाव्य कोटीतली नाहीत. वास्तवतेचा त्यांना आधार आहे. म्हणून प्रस्तुत पुस्तकाला जोडलेल्या छोटयाश्या प्रास्ताविकांत पु.लं.नी म्हटले आहे – ''ह्या व्यक्ति आणि वल्ली म्हटल्या तर भेटल्या आहेत म्हटल्या तर नाहीत.'' 'व्यक्ति आणि वल्ली' चा सर्वात प्रमुख विशेष म्हणजे प्रत्येक व्यक्ती व क्षेत्राचे, भोवतालच्या परिस्थितीचे पु.लं.नी केलेले अत्यंत सूक्ष्म निरीक्षण व चित्रण. या संग्रहातील प्रत्येक व्यक्ति या विशेषाचा प्रत्यय देते. संग्रहाच्या नावाप्रमाणे यातील व्यक्तिमध्ये एक एक वल्ली दडलेली आहे. कोणत्याही व्यक्तिचित्रात पु.ल. व्यक्तीच्या चेहऱ्याचे वर्णन न करता इतर पोषाख, बोलणे चालणे, लकबी, सवयीचे वर्णन करतात आणि व्यक्तीच्या अंतर्मनाचा वेध घेतात कारण त्यांना व्यक्तिपेक्षा ती मधील प्रवृत्ती दाखवायची आहे. त्यामुळे बहुतेक व्यक्तिचित्रे हे प्रातिनिधिक स्वरूपाचे नमुने सादर करतात.

व्यक्तिचित्र लेखनातील आत्यंतिक सहजता हे या संग्रहाचे महत्वाचे वैशिष्टय आहे.

विनोद, कारूण्य, एखादे मतप्रदर्शन काहीही असले तरी त्यात कुठेही कृत्रिमता, ओढाताण नाही. मात्र गंपू, बापू नारायण, चितळे मास्तर या व्यक्तिचित्रांच्या वेशभूषेत मात्र साम्य आहे. पात्र, वातावरण, काळ–वेळ यानुसार बदलणारी व अत्यंत परिणाम साधणारी भाषा हा 'व्यक्ति आणि वल्ली' ने दिलेला मराठी वाड्.मयाचा अलंकार म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. व्यक्तिचित्रांच्या संदर्भात छोटया घटना प्रसंगांची येणारी शब्दचित्रे हा या संग्रहाचा विशेष आहे. पु.लं.च्या ढंगाची विनोदस्थळे या संग्रहात बरीच आहेत. विनोदाप्रमाणेच मास्तरांच्या घरात बायकोच्या गळयात काही मोत्ये पडली नाहीत. डोळयात पडली. अशी कारूण्याचे हृदयस्पर्शी दर्शन घडविणारी चमकदार वाक्ये एक साहित्यिक म्हणून या लेखकाचा उच्च दर्जा स्पष्ट करतात.

अवती भवतीच्या जगात पु.लं.ना ज्या ज्या व्यक्तीत काही विशेष गुण आढळला, काही अविस्मरणीय स्वभावधर्म दिसून आला त्यातले काही निवडक नमुने या ग्रंथातून त्यांनी सादर केले आहे. हे नमुने निरनिराळया थरांतले, निरनिराळया क्षेत्रातले आहेत. प्रत्येकाच्या आवडी--निवडी वेगवेगळया तसे त्यांच्यावर झालेले संस्कारही वेगवेगळया प्रकारचे. कलावंत, साहित्यिक, समाजसेवक, शिक्षक, परीट अशी भिन्न भिन्न कार्यक्षेत्रातील व्यक्ति इथं सापडतील, तशीच कसलाच व्यवसाय अगर छंद नसलेली अंतू बर्व्यांसारखी प्रापंचिक माणसंही आढळून येतील. भाबडा नारायण अन् इरसाल बबडू, ध्येयनिष्ठ हरितात्या अन् कसलेच ध्येय नसलेला गजा खोत अशी विविध प्रकृतीची विविध गुणांची माणसं इथं एकत्र आली आहेत.

'गणगोत' हा पु.ल. देशपांडे यांचा दुसरा व्यक्तिचित्रण ग्रंथ. 1966 मध्ये प्रसिद्ध झाला. या संग्रहातील व्यक्ती वास्तव आहेत. 'गणगोत' मध्ये काही व्यक्ती अप्रसिद्ध आहेत. 'गणगोत' मध्ये पु.लं.नी त्यांच्या सहवासातील सन 1952 ते 1965 या काळातील लिहिलेल्या व्यक्तिचित्रांचे संकलन करण्यात आले आहे. लेखकाच्या जीवनातील व्यक्तींची सहवास चित्रे 'गणगोत' मध्ये आल्याचे संग्रहाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे. माणूस व माणुसकीचे आकर्षण लेखकाला असल्याने विविध क्षेत्रातील वयातील व्यक्तींची चित्रे लेखकाने पुढील प्रमाणे रेखाटली आहेत. – ऋग्वेदी (वामन मंगेश दुभाषी), दिनेश (लेखकाचा भाचा), बाय (ऋग्वेदींची पत्नी, लेखकाची आजी), आप्पा (लेखकाचे सासरे) या कौटुंबिक व्यक्ती, फणसळकर मास्तर व रावसाहेब या लेखकाशी घरोबा असणाऱ्या

व्यक्ती, इंटरनॅशनल दीक्षित, रा.ज. देशमुख, ब.मो. पुरंदरे ही लेखन क्षेत्रातील संबंधीत मंडळी, कलाक्षेत्रातील चोभे, चिंतामणराव कोल्हटकर, हिराबाई, केशवराव भोळे, रामूभय्या दाते, बालगंधर्व, आदरणीय व्यक्ती विनोबा भावे.

आदर, श्रद्धा, कौतुक, मैत्री अशा विविध दृष्टीकोणातून ही निखळ व्यक्तिचित्रे लिहिली असून लेखकाने या व्यक्ती पूर्णपणे वास्तव स्वरूपात रंगविण्याचा बराचसा यशस्वी प्रयत्न केला आहे. ही व्यक्तिचित्रे रंगविताना बऱ्याच वेळा वर्ण्य व्यक्तीचा पोषाख, रंगरूप वर्णन करून त्यांना खास सवयी – लकबींची जोड दिली आहे. निरनिराळया वेचक प्रसंगातून अंतरंग दर्शन घडविताना व्यक्तीनुरूप खास शैलीची जोड दिल्यामुळे ही चित्रे जिवंत झाली आहेत. अधुन--मधून होणारा विनोदाचा शिडकावा लेखनात अधिकच प्रसन्नता आणतो. रावसाहेब, दिनेश, चोभे, बळवंत मोरेश्वर पुरंदरे, इंटरनॅशनल दिक्षीत ही व्यक्तिचित्रेही उल्लेखनीय आहेत. 'दिनेश' या सव्वादोन वर्षाच्या बाळाचे चित्रण करताना बालकांच्या संदर्भातील पु.लं.ची सूक्ष्म निरिक्षण शक्ती दिसते, तर 'व्यक्ति आणि वल्ली'तील नारायणाच्या जातकुळातील चोभे, फिल्म स्टुडिओतील श्रमिकांचे प्रातिनिधिक दर्शन घडवितात. 'देशस्थी' रंगाच्या व कायस्थी अंगाच्या 'इतिहासकार' शिवशाहीर ब.मो. पुरंदरे यांच्या चित्रणातून लेखकाला वर्ण्य व्यक्ती विषयी वाटणारे भाव प्रकट होतात तर इंटरनॅशनल दिक्षीतांच्या चित्रणातून संवादांच्या समर्पक वापरातून वर्ण्य व्यक्तीचे चित्र उभे करण्याचे पु.लं.चे कौशल्य दिसते.

'व्यक्ति आणि वल्ली' प्रमाणेच शैली हे 'गणगोत'चे वैशिष्टय आहे. पु.लं.ची शैली खास त्यांची असून वर्ण्य व्यक्ती नुसार ती बदलते. दिनेशच्या वर्णनात ती खास बालरूप धारण करते तर दीक्षितांच्या वर्णनात तीत प्रेमळ विनोदी सूर येतो. ब.मो. पुरंदरे रंगविताना तीमध्ये खास ऐतिहासिक थाट येतो तर विनोबांचे चित्रण करताना ती उदात्त, गंभीर रूप धारण करते. हिराबाई, रामूभय्यांच्या वर्णनात ती षड्ज पंचमाची रसिक भाषा बोलते तर रावसाहेबांचा थाट ती अस्सल शिवराळ साज घेऊन व्यक्त करते. ऋग्वेदी, बाय, फणसळकर, आप्पा, बालगंधर्व, चिंतामण रावांच्या वर्णनात ती आदराने नम्र होते.

ही व्यक्तिचित्रे काही निमित्ताने लिहिली गेली तरी त्यात नैमित्तिक कामचलाऊपणा तर नाहीच परंतु उत्तम साहित्याचा दर्जेदारपणा आहे. या व्यक्तिचित्रांमधून लेखकाची बहुश्रुतता, व्यासंग, रसिकता यांचा प्रत्यय येतो. तसेच काही प्रसंगातून सामाजिक व्यंगावर केलेली टीकाही आढळते. अशा समतोल लेखनपद्धतीमुळेच ही व्यक्तिचित्रे सरस ठरली असून त्यांना यश लाभले आहे.

याप्रमाणे, पु.ल. देशपांडे यांच्या व्यक्तिचित्रणाचे विशेष त्यांच्या 'व्यक्ति आणि वल्ली' व 'गणगोत' या संग्रहाद्वारे मांडण्याचा मी प्रयत्न केला आहे. मराठी सारस्वतातील पु.ल. देशपांडे यांचे स्थान अनन्यसाधारण आहे. अशा या महान लेखकाच्या या दोन वाङ्‌मयीन कलाकृतीचा पट मी उलगडून दाखविला आहे. माझ्या लेखनाला काही मर्यादाही पडण्याची शक्यता आहे. कारण संशोधनात कोणताही शब्द अखेरचा नसतो. जस जसे संदर्भ उपलब्ध होत जातात तसतसा संशोधनाचा आलेख बदलतो. मी प्रामाणिकपणाने ही सर्व मांडणी केली आहे. ती नवीन पद्धतीने केली आहे. एका विश्लेषणात्मक भूमिकेतून केली आहे. त्याला माझ्या अनुभवाची मर्यादा आहे याची मला जाणीव आहे. तरी माझ्या लेखनाने मराठीच्या अभ्यासात एक नवीन भर पडली आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरू नये असे मला वाटते.

(कु. वैशाली गुदगे)
अभ्यासक

(डॉ. कन्हैया कुंदप)
मार्गदर्शक

---------